लोकसत्ता [ पुणे ]

२ WWW.LOKSATTA.COM
गुरुवार, १४ मार्च २०१९

## 'आम्ही सहचारिणी'

**पुणे :** हिंदू महिला सभेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'आम्ही सहचारिणी' या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या पत्नीची मुलाखत घेण्यात आली. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या पत्नी अपर्णा अभ्यंकर, राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या पत्नी शुभांगी आफळे, ज्येष्ठ व्हायोलिनवादक रमाकांत परांजपे यांच्या पत्नी वसुंधरा परांजपे, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या पत्नी ज्योती जोशी, प्रसिद्ध गायक विजय कोपरकर यांच्या पत्नी नीता कोपरकर आणि 'आपलं घर'चे विजय फळणीकर यांच्या पत्नी साधना फळणीकर यांचा त्यात समावेश होता.